# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

### मंगळवार, दिनांक ०९ डिसेंबर, २०२५

(सकाळी ११.०० वाजता)

**एक** : **प्रश्नोत्तरे**

**दोन** : **कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

(१) **मुख्यमंत्री** : "महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) **संसदीय कार्य मंत्री** : "विधानपरिषदेच्या सन २०२५ च्या तिसऱ्या (हिवाळी) अधिवेशनात सन २०२५ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात दिनांक ३० जून, २०२५ ते दिनांक १८ जुलै, २०२५ या कालावधीत मा.मंत्री महोदयांनी विधानपरिषद सभागृहात दिलेल्या एकूण ४४२ आश्वासनांची यादी, तसेच सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, पूर्तता करण्यात आलेल्या एकूण २३४ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणे यादीसह" विधानपरिषदेच्या सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(३) **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** :

(क) "तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा सव्वीसावा वार्षिक वित्तीय अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(ख) "कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन २०२३-२०२४ या वर्षांचा वार्षिक वित्तीय अहवाल व लेख्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचा अलग लेखा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(४) **खनिकर्म मंत्री** : "मॉयल लिमिटेड यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा त्रेसष्टावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **श्री.सुनिल शिंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"मुंबई महानगरपालिकेने क्रॉफर्ड मार्केट येथील मासळी विक्रेत्यांना महात्मा जोतिबा फुले मंडईत स्थलांतरित करण्याचा घेतलेला निर्णय, विक्रेत्यांनी मात्र नवीन मंडईत जाण्यास केलेला विरोध आणि जुन्या जागेतच व्यवसायासाठी मागितलेली जागा, विक्रेत्यांनी भाडेतत्त्वावरील करारावर उपस्थित केलेले प्रश्नचिन्ह, छत्रपती शिवाजी महाराज मंडई प्रकल्पाच्या लिलाव प्रक्रियेत घोटाळा झाल्याचा अखिल मच्छिमार कृती समितीने केलेला आरोप, या पुनर्वसनासाठी मुंबई महानगरपालिकेने केलेला ११० कोटी रुपयांचा खर्च वाया जाण्याची निर्माण झालेली शक्यता, मुंबईतील महानगरपालिकेच्या इतर मंडईत देखील अनेक समस्या असणे, या मंडईंमध्ये स्वच्छतेचा अभाव आणि कचरा व्यवस्थापनाच्या अपुऱ्या सुविधांमुळे निर्माण होत असलेल्या आरोग्यविषयक समस्या, अनेक मंडईंमध्ये जुन्या भाडेकरूंच्या समस्या, परवानग्यांचे नूतनीकरण आणि दीर्घकालीन भाडेकरूंसोबत होणारे वाद ही आव्हाने असणे, मंडईंच्या व्यवस्थापनासाठी स्पष्ट आणि प्रभावी धोरणांचा अभाव असल्याने उद्‌भवणाऱ्या अनेक समस्या, त्यांचे निराकरण करण्याऐवजी मंडईंच्या इमारती अतिधोकादायक ठरवून निष्कासित केल्यानंतर महसुलवाढीसाठी मोकळा झालेला भूखंड हा निविदा मागवून भाडेपट्टा तत्त्वावर देण्याचा मुंबई महानगरपालिकेने घेतलेला निर्णय, त्यामुळे या मंडईत वर्षानुवर्षे व्यवसाय करणाऱ्या व्यवसायिकांवर व रहिवाश्यांवर होत असलेला घोर अन्याय, त्यामुळे त्यांच्यामध्ये शासनाप्रती पसरलेली तीव्र नाराजीची आणि असंतोषाची भावना, मुंबईतील महानगरपालिकेच्या मंडईतील विक्रेत्यांच्या समस्यांवर तोडगा काढण्याबाबत आणि त्यांना आधुनिक सुविधा पुरवण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि उपाययोजना."

(२) **श्री.योगेश टिळेकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"जलसंपदा विभागाच्या पुणे पाटबंधारे मंडळाकडून पुणे महापालिकेसाठी सन २०२५-२६ या वर्षासाठी १६.३२ टीएमसी पाणी आरक्षित करण्याची मागणी केली असतानाही पाटबंधारे विभागाने ही मागणी नाकारून १४.६१ टीएमसी पाणीकोटा आरक्षित केला असणे, सन २०३१ पर्यंत शहरासाठी

केवळ १४.६१ टीएमसी पाणी पुरवठाच केला जाईल असे स्पष्ट करणे, त्यामुळे महापालिकेला वाढीव पाणी मिळणार नसल्याचे स्पष्ट होणे, महापालिकेच्या पाण्याच्या अंदाजपत्रकात ३४ समाविष्ट गावांची लोकसंख्या आधीच समाविष्ट असल्याचे सांगत वाढीव पाणी देण्यास पाटबंधारे विभागाने नकार दिला असणे, समाविष्ट गावांसाठी १.७५ टीएमसी पाणीकोटा मंजूर असून सध्याच्या लोकसंख्येच्या तुलनेत वर्षाला किमान २.५० टीएमसी पाणी आवश्यक असताना प्रत्यक्षात पाटबंधारे विभागाने केवळ १.६६ टीएमसी पाणी मंजूर केले असणे, समाविष्ट गावांसाठी दरडोई १२० लिटर पाणी आवश्यक असताना ७० लिटरच गृहित धरल्यामुळे महापालिकेने सप्टेंबर महिन्यात पाटबंधारे विभागाकडे सादर केलेला सुधारित प्रस्ताव नाकारत पाणीकोटा वाढवून देण्यास नकार देणे, त्यामुळे पुणेकरांना पाणी कपातीचा सामना करावा लागून वाढीव पाणी मिळविण्यासाठी महापालिकेला दरवर्षी १५० ते २०० कोटी रुपयांचा दंड पाटबंधारे मंडळाकडे भरावा लागत असणे, यासाठी वाढलेली लोकसंख्या आणि गळतीत झालेली घट या बाबींचा विचार करून पुणे महापालिकेने सुमारे २२ टीएमसी पाण्याची केलेली मागणी पाटबंधारे विभागाने मंजूर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **सर्वश्री जयंत आसगावकर, अभिजित वंजारी, अशोक उर्फ भाई जगताप, राजेश राठोड, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, सतेज उर्फ बंटी पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (युजीसी) दिनांक ६ जून, २०२४ रोजी प्राध्यापकांची किमान पात्रता व पदोन्नतीच्या संदर्भात चौथी अधिसूचना (4th amendment) भारत सरकारच्या राजपत्रात प्रसिद्ध करून ती देशभर लागू करणे, ती प्रत्येक राज्यात त्वरित कार्यान्वित करण्याचे निर्देश देणारे पत्र दिनांक २० जून, २०२४ रोजी निर्गमित होणे, त्या अनुषंगाने गुजरात, दिल्ली, तेलंगाणा, पश्चिम बंगाल, केरळ, मिझोराम व इतर राज्याकडून सदरची अधिसूचना लागू करून घेणे, परंतु गेल्या १८ महिन्यापासून ही अधिसूचना महाराष्ट्र राज्यात लागू झालेली नसणे, या विलंबामुळे राज्यातील शेकडो प्राध्यापकांच्या CAS (Career Advancement Scheme) अंतर्गत होणारी पदोन्नती, सेवाजेष्ठता व सेवाशर्ती संबंधित अनेक बाबी अनिश्चिततेत असणे, माहे मार्च-एप्रिल, २०२५ च्या सुमारास शिक्षण महासंचालक, उच्च शिक्षण विभागाकडून या अधिसूचनेच्या अंमलबजावणीसाठी लागणाऱ्या आर्थिक तरतुदीची माहिती सहसंचालकाकडून घेणे, त्यानुसार आर्थिक तरतुदीचा सुमारे ७२ कोटीचा प्रस्ताव वित्त विभागाकडे दिनांक ४ मे, २०२५ रोजी पाठविणे, मात्र सदर प्रस्ताव

वित्त मंत्रालयात गेली ७ महिने धूळखात पडणे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालयाकडून दिनांक १४ ऑक्टोबर, दिनांक २८ ऑक्टोबर व दिनांक ११ नोव्हेंबर, २०२५ रोजी तीन बैठकांचे आयोजन करणे, ऐनवेळी या सर्व बैठका रद्द होणे, या सगळ्या प्रकियेमुळे/दिरंगाईमुळे प्राध्यापकांच्या मनात अनिश्चितता व नैराश्य निर्माण होणे, तरी आपल्या राज्यात युजीसीच्या चौथ्या अमेंडमेंटची तात्काळ अंमलबजावणी होणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(४) **डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पूर्व विदर्भातील भंडारा, नागपूर व चंद्रपूर जिल्ह्यांना सिंचन व पिण्याचे पाणी पुरवणारा गोसीखुर्द राष्ट्रीय सिंचन प्रकल्प हा सुमारे २.५ लाख हेक्टर क्षेत्रासाठी जीवनदायी जलस्रोत असणे, नागपूर शहरातून वाहणाऱ्या नाग नदीचे प्रक्रिया न केलेले सांडपाणी व औद्योगिक रसायने कन्हान आणि वैनगंगा नदीत मिसळून पुढे गोसीखुर्द धरणात जमा होत असल्याने धरणाचे पाणी अत्यंत प्रदूषित असणे, या दूषित पाण्यामुळे सिंचनाखालील शेतीमधील उत्पादन घटणे, जमिनीत मीठ व फ्लोराईड साचणे, जनावरांना आजार होणे व मानवांमध्ये मूत्रपिंड, त्वचा व इतर विकार वाढण्याचा धोका निर्माण होणे, धरणावर अवलंबून असलेल्या मच्छीमारांचा व्यवसाय उद्ध्वस्त होणे, या प्रदूषित पाण्यामुळे भंडारा, नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यातील शेती आणि पिण्याच्या पाण्याचे स्रोत धोक्यात आले असून, नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असणे, या विरोधात 'गोसीखुर्द प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती' आणि विविध राजकीय पक्षांनी वारंवार आंदोलने करूनही प्रदूषणावर ठोस उपाययोजना करण्यात अपयश येत असणे, नाग नदी प्रदूषण निर्मूलनासाठी १९०० कोटी रुपयांचा प्रकल्प मंजूर असूनही त्याच्या अंमलबजावणीत प्रचंड दिरंगाई होत असल्याने परिस्थिती अधिकच बिकट होत असणे, तरी शासनाने प्रदूषण निर्मूलन प्रकल्प युद्धपातळीवर राबवावा व नाग नदीच्या पाण्यावर प्रक्रिया करण्याबाबत तसेच गोसीखुर्द मधील पाणी शुद्ध करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कामगार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"छत्रपती संभाजीनगर मधील perkins india pvt.ltd या नामांकित कंपनीमध्ये बोगसरित्या १७ परप्रांतीय कामगारांचे बनावट / खोटे कागदपत्र तयार करुन माथाडी स्वरुपाची नोंदणी करुन करोडो रुपयांचा आर्थिक भ्रष्टाचार

सुरु असल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये उघडकीस येणे, तत्कालीन छत्रपती संभाजीनगर माथाडी मंडळातील अध्यक्ष, सचिव व निरीक्षक यांनी बोगस संघटनेला तसेच मालक प्रतिनिधी यांच्याशी संगनमत करुन केलेला आर्थिक भ्रष्टाचार, एन.एल.एम.के. कोटिंग प्रा.लि या नामांकित कंपनीमध्ये तीन माथाडी कामगारांची नोंदणी संघटनेमार्फत करण्यात येणे, यातील बोगस माथाडी कामगार एकही दिवस कामावर न येता करोडो रुपयांची आर्थिक भ्रष्टाचार करणे, लोकप्रतिनिधीनी भ्रष्टाचारासंदर्भात विविध आयुधांद्वारे शासनाचे लक्ष वेधले असता कामगार मंत्री महोदयांनी सह आयुक्त (माथाडी) कामगार यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमणे, मा.मुख्यमंत्री, कामगार मंत्री यांच्याकडे सातत्याने भ्रष्टाचारासंबंधात तक्रारी करुनही जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, शासन भ्रष्टाचारास पाठीशी घालण्याचा करीत असलेला प्रयत्न, परिणामी कामगारांमध्ये निर्माण झालेली संभ्रमाची भावना, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, अशा प्रकारे अनेक कंपन्यामध्ये बोगस माथाडी कामगाराची नोंदणी करुन करोडो रुपयांचा करीत असलेल्या भ्रष्टाचाराची एस.आय.टी. मार्फत चौकशी करुन दोषी कंपन्यांविरुध्द कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

**सहा : शासकीय विधेयके –**

**(क) पुर:स्थापनार्थ –**

"सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १५ –महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५"

**(ख) विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

(१) "सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १३ –महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०२५"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री एकनाथराव खडसे, सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अभिजित वंजारी, जयंत आसगावकर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे वि.प.वि. क्रमांक १३- महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(२) "सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १४ – मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२५"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री एकनाथराव खडसे, सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अभिजित वंजारी, जयंत आसगावकर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १४ – मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**सात** : **सर्वश्री प्रविण दरेकर,** विक्रम काळे, प्रसाद लाड, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री अमोल मिटकरी, सदाशिव खोत, श्रीमती भावना गवळी, श्री.संजय खोडके, डॉ.परिणय फुके, सर्वश्री कृपाल तुमाने, इद्रिस नायकवडी, श्रीकांत भारतीय, किशोर दराडे, शिवाजीराव गर्जे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री किरण सरनाईक, दादाराव केचे, संदीप जोशी, संजय केणेकर, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री वसंत खंडेलवाल, अमरिशभाई पटेल, रणजितसिंह मोहिते-पाटील, योगेश टिळेकर, विक्रांत पाटील, अमित गोरखे, धर्मगुरू राठोड, वि.प.स. यांचा **म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** –

"राज्यातील २९ जिल्हे, २५३ तालुके आणि २०५९ मंडळे यामध्ये अवकाळी पावसामुळे व अतिवृष्टीमुळे नद्या व नाल्यांना आलेले पूर, विदर्भ-मराठवाडयातील शेतक-यांचे उभे पीक वाहून गेल्याने शेतकरी बांधव अभूतपूर्व संकटात सापडले असणे, शेती हा केवळ उपजीविकेचा मार्ग नाही तर अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने नैसर्गिक आपत्तीत शासन शेतक-यांच्या पाठीशी ठामपणे उभे असणे, शाश्वत शेती समृध्द शेतकरी हे लक्ष्य समोर ठेऊन व सर्व निकष बाजूला ठेवून नुकसानग्रस्त शेतक-यांना शासनाकडून सर्वकष मदत तात्काळ देण्यात येणे, नुकसानाबाबत मोबाईल व ड्रोनद्वारे काढण्यात आलेले फोटो स्विकारण्याचा महत्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला असणे, युती शासनाने तब्बल ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे ऐतिहासिक मदत पॅकेज जाहिर करुन

शेतक-यांना तात्काळ दिलासा देण्यात येणे, जमिन खरडून गेलेल्या शेतक-यांना ४७ हजार रुपये प्रतीहेक्टर रोख तसेच नरेगा योजनेच्या माध्यमातून ३ लाख रुपये प्रती हेक्टर अतिरिक्त मदत देण्यात येणे, गाडलेल्या विहिरींसाठी ३० हजार रुपये भरपाई देण्यात येणे, पडझड झालेल्या घरांच्या जागी नवीन घरे बांधण्याकरिता प्रधानमंत्री आवास योजनेतून १०० टक्के मदत देण्यात येणे, दुधाळ जनावारांकरिता जवळपास ३७ हजार ५०० रुपयांपर्यंत प्रति जनावर मदत देण्यात येणे, एनडीआरएफमध्ये असलेली ३ जनावरांपर्यंतची मर्यादा शिथिल करण्यात येणे, ओढकाम करणा-या जनावरांकरिता ३२ हजार रुपये प्रति जनावर देण्यात येणे, संबंधित भागातील विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क माफ करण्यात येणे, वीज बिलाची वसूल थांबविण्यात येणे, राज्यातील २ हजार ५९ मंडळांमध्ये क्रॉप डॅमेज झालेला निदर्शनास आल्याने त्याठिकाणी ६५ मिलीमीटरची अट शिथिल करुन मदत करण्याचा निर्णय करण्यात येणे, शेतकरी पुन्हा आपल्या पायावर उभा असला पहिजे आणि भविष्यात शेती समृध्द झाली पाहिजे या हेतूने राज्याचे मा. मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री तसेच अनेक मंत्र्यांनी शेतक-यांच्या बांधावर जाऊन व नुकसानाबाबत त्यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करुन त्यांना तातडीने मदत देण्याची यंत्रणा उभारली असणे, बिबटे, वाघ अशा हिंस्त्र व वन्य प्रण्यांचे हल्ले वाढले असल्याने शेतक-यांना मृत्यूस सामोरे जावे लागणे, या प्राण्यांमुळे शेतपिकांचे होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने शेताला कुंपन घालण्यासाठी शेतक-यांना अनुदान देण्याची आवश्यकता, पाणंद रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पाणंद रस्ते योजना" अधिक सुटसुटीत करुन राबविण्याची आवश्यकता, सर्प दंशाचे प्रमाण ग्रमीण भागात वाढले असल्याने मृत झालेल्या व्यक्तींना गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना लागू करण्याची व त्यामध्ये मृत व्यक्तींच्या कुटुंबियाला २ लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्याची आवश्यकता, विदर्भ, मराठवाडयासह उर्वरित महाराष्ट्रातील मागासभागाचा अनुशेष दूर करण्यासाठी शासनाने उचललेली ठोस पाऊले, विदर्भ, मराठवाडयाशी संबंधित वैनगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्प पूर्ण करुन बळीराजाला सिंचनासाठी मुबलक पाणी पुरवठा करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, अमरावती येथे मेघा टेक्सटाईल पार्कची केलेली निर्मिती, विदर्भात रोजगार उपलब्ध करण्याच्या दृष्टीने अतिदुर्गम गडचिरोली जिल्हयात उभारण्यात येत असलेले उद्योग, "मराठवाडा वॉटर ग्रीन" हा महत्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी महायुती सरकारने घेतलेला निर्णय, गडचिरोली नवीन रेल्वे मार्ग, नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प इत्यादी कामांना गती देण्यात येणे, विदर्भासाठी ३५ हजार कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांना मान्यता देण्यात येणे, राज्यात नैसर्गिक शेतीला प्रेत्साहन देण्यात येणे, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना आणि दुष्काळी भागासाठी असलेल्या बळीराजा जलसंजीवनी या केंद्र अर्थसहाय्य योजनांबरोबर राज्यातील रखडलेल्या सिंचन प्रकल्पांना गती देण्यात येणे, महावितरणच्या माध्यमातून शेतक-यांना १ लाख सौर कृषी पंपाचे वाटप करण्यात येणे, मुबलक विजेसाठी सौर ऊर्जा प्रकल्पांना गती देण्यात येणे, या नैसर्गिक आपत्तीमध्ये दुर्देवाने मृत्यू झालेल्या व जखमी झालेल्या शेतक-यांनाही शासनाकडून मदत देण्यात येणे, कुक्कुटपालनाला १०० रुपये प्रती कोंबडी मदत देण्यात येणे, पीक विमा उतरविलेल्या शेतक-यांना विम्याद्वारे प्रती हेक्टर रुपये १७ हजार मदत

देण्यात येणे, बियाणे व इतर कामांसाठी प्रतिहेक्टर रुपये १० हजार सर्वसाधारण मदत देण्यात येणे इ. मार्गाने आपत्तीग्रस्त बाधित कुटुंबांना सर्वकष मदत देऊन शेतक-यांप्रती असलेले उत्तरदायित्व जपण्याचा प्रयत्न करणे, अशा रीतीने प्रभावी मदत कार्यातून आपत्तीग्रस्तांना दिलासा देण्यात हे शासन जागृत असणे, विदर्भ-मराठवाडयासह संपूर्ण राज्याचा विकास व राज्यातील शेतकरी समृध्द होण्याबाबत राज्यातील आपदग्रस्त शेतकरी स्वतःच्या पायावर उभा रहावा याकरिता करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

आठ : **अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

(१) **श्रीमती उमा खापरे, सर्वश्री. प्रविण दरेकर, प्रसाद लाड, वि.प.स.**

**"राज्यात परिचर्या संचालनालय स्थापन करण्याबाबत"** या विषयावरील **श्री.विक्रम काळे, वि.प.स.** यांचा दिनांक १० जुलै, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ४ मधील अतारांकित प्रश्न क्रमांक **२३५८३** ला दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

(२) **सर्वश्री. सत्यजीत तांबे, विक्रम काळे, किशोर दराडे, वि.प.स.**

**"सीबीएसई अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील इतिहासाचे लेखन अपुरे असल्याबाबत"** या विषयावरील **श्री. सत्यजीत तांबे व इतर वि.प.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक **४४७४** ला दिनांक १८ जुलै, २०२५ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : ०८ डिसेंबर, २०२५

**डॉ.विलास आठवले**
सचिव - ३ ,
महाराष्ट्र विधानपरिषद

शासकीय मुद्रणालय, नागपूर.